| | | |
|---|---|---|
| *MHAM180006442014* | दाखल दिनांक -<br>नोंदणी दिनांक -<br>न्यायनिर्णय दिनांक -<br>कालावधी - | २१/०१/२०१४<br>२१/०१/२०१४<br>१५/०७/२०२६<br>वर्ष महिने दिवस<br>१२ ०५ २५ |

<u>नियमित फौ. प्रकरण क्र. : १८/२०१४</u> <u>नि.क्रमांक</u> –<u>२७</u>

**नमुना क्र. XXXII**
**भाग 'अ'**
**(न्यायनिर्णयाचे शिर्षपृष्ठ)**
**[फौजदारी नियमावली मधील प्रकरण VI मधील परिच्छेद 44(i)]**

**सह प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, वरुड, ता.- वरुड, जि.-अमरावती यांच्या न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी - आय.जे. ठाकरे)**

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय तारीख : | १५/०७/२०२६ |
| नि. फौजदारी प्रकरण क्र. | १८/२०१४ |
| अपराध क्रमांक | २०९/२०१३ |
| पोलीस स्टेशन | वरुड, ता.वरुड,<br>जि.-अमरावती |

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन वरुड,<br>ता. वरुड, जि. अमरावती |
| **अभियोग पक्षातर्फे** | श्री. एम. ए. यावले, सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | १) पवन दिलीप पानसे,<br>वय– २० वर्ष, व्यवसाय– मजुरी,<br>२) राहूल रमेशराव पाटनकर,<br>वय– २१ वर्ष, व्यवसाय– मजुरी,<br>दोन्ही रा. ताज नगर, वरूड, ता.वरूड,जि.–अमरावती |
| **आरोपी तर्फे** | विद्वान विधिज्ञ श्रीमती ए.ए. सराटकर |

## भाग 'ब'

## [फौजदारी नियमावली मधील प्रकरण VI मधील परिच्छेद 44(ii)]

| | |
|---|---|
| अपराधाचा दिनांक | १५/११/२०१३ |
| प्रथम खबरी दिनांक | १५/११/२०१३ |
| दोषारोप पत्र दाखल दिनांक | २१/०१/२०१४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १५/०२/२०१८ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | २८/०२/२०२० |
| न्यायनिर्णय राखुन ठेवलेला दिनांक | १५/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | १५/०७/२०२६ |
| शिक्षेसंबधीचा आदेशाचा दिनांक, जर असल्यास | – -- |

### आरोपींची माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जमानतीवर सोडल्याचा दिनांक | गुन्हयातील कलम | निर्दोष अथवा दोषी असल्याबाबत | दिलेली शिक्षा | कलम ४२८ करीता प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना कैदेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | पवन दिलीप पानसे | १६/११/१३ | १६/११/१३ | भा.दं.वी. चे कलम ३२४ सहकलम ३४ | **निर्दोष** | नाही | – -- |
| २) | राहूल रमेशराव पाटनकर | | | | | | |

## भाग 'क'

## [फौजदारी नियमावली मधील प्रकरण VI मधील परिच्छेद 44(iii)]

## साक्षीदारांची यादी (अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयातर्फे)

### अ. अभियोग पक्ष

| अ. क्र. | नाव | साक्षीदाराचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी, पोलीस साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच साक्षीदार) |
|---|---|---|
| सा. क्र.१ | सुरेश मारोतराव बंदे, (नि.क्र.२२) | पंच साक्षीदार |
| सा.क्र.२ | शोभा पुरुशोत्तम फोसे (नि.क्र.२५) | साक्षीदार |

### ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास

| अ.क्र. | नाव | साक्षीदाराचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी, पोलीस साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच साक्षीदार) |
|---|---|---|
| – – | निरंक | – -- |

**क. न्यायालयातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार, असल्यास**

| अ. क्र. | नाव | साक्षीदाराचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी, पोलीस साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच साक्षीदार) |
|---|---|---|
| — — | निरंक | — —— |

**देण्यात आलेल्या निशाणींची यादी (अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयातर्फे )**

**अ. अभियोग पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी | विवरण |
|---|---|---|
| १. | —— | —— |

**ब. बचाव पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी | विवरण |
|---|---|---|
| —— | —— | —— |

**क. न्यायालयातर्फे :**

| अ.क्र. | निशाणी | विवरण |
|---|---|---|
| — — | — — | — — |

**ड. मटेरियल ऑब्जेक्ट:**

| अ.क्र. | मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| — — | — — | — — |

**दोषारोप :– भारतीय दंड संहिता कलम ३२४ व ३४ नुसार**

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक – १५/०७/२०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४ व ३४ खालील अपराध केल्याचा दोषारोप ठेवण्यात आलेला आहे.

प्रकरणाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहे.

२. दिनांक १५/११/२०१३ रोजी रात्री ८:३० ते ९:०० वाजेच्या दरम्यान आरोपी पवन हा त्याच्या आईला शिवीगाळ करीत होता. त्यावेळी फिर्यादी व त्यांची पत्नी घराबाहेर उभे राहिले असता आरोपी पवन व राहूल दोघेही फिर्यादीच्या अंगावर आले आणि डोक्यावर व उजव्या दंडावर काठीने मारहाण केली होती. त्यामुळे फिर्यादींच्या डोक्यातून रक्त निघाले होते. त्यावेळी फिर्यादीची पत्नी व शेजाऱ्यांनी त्यांना सरकारी दवाखाना वरूड येथे उपचारा करीता भरती केले होते. तेथे पोलीसांनी त्यांचे बयान घेतले होते. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशन अधिकारी, वरुड येथे अपराध क्र.२०९/२०१३ नुसार वरील कलमांन्वये अपराध नोंदवण्यात आला. तपासा दरम्यान तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांची बयाने नोंदवली आणि प्रकरणात आवश्यक तो पुरावा हस्तगत करुन आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

३. आरोपी हजर झाल्यानंतर त्यांच्या विरुध्द नि.क्र.१४ वर भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम ३४ खालील अपराधाकरीता दोषारोप ठेवला. तो आरोपींना वाचून दाखविला असता त्यांनी अनुक्रमे निशाणी क्र. १५ ते १६ वरील निवेदनात नाकबूल केले व संपरीक्षेची मागणी केली. त्यामुळे नि.क्र.१ वर झालेल्या आदेशानुसार आरोपीविरुध्द पुढे चालविण्यात आले. त्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा नोंदवण्यात आला. सदर खटल्यात आरोपींविरूध्द अपराधदर्शक पुरावा आढळून न आल्याने त्याचे फौ.प्र.सं. चे कलम ३१३ प्रमाणे बयान नोंदविण्यात आले नाही.

४. दोन्ही पक्षांचे म्हणणे विचारात घेता खालील मुद्दे सदरचे प्रकरण

निकाली काढण्याकरीता तयार केले. त्या मुद्दयांना खालील उत्तरे दिली आहे व त्याचे निष्कर्ष बाजूला दिलेले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक १५/११/२०१३ रोजी रात्री ८:३० ते ९:०० वाजेच्या दरम्यान आरोपी पवन व राहूल यांनी संगनमताने फिर्यादीस डोक्यावर लाकडी काठीने मारून इच्छापूर्वक दुखापत केली व त्यायोगे भा.दं.वि.चे कलम ३२४ सह कलम ३४ प्रमाणे अपराध केला? | **नकारार्थी**. |
| २. | आदेश काय ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

५. अभियोग पक्षाने त्यांची बाजू सिध्द करण्याकरीता पंच सा.क्र.१ सुरेश मारोतराव बंदे व सा.क्र.२ शोभा पुरुषोत्तम फोसे यांना अनुक्रमे नि.क्र.२२ व २५ वर तपासले. अभियोग पक्षास वारंवार संधी देवुन सुध्दा त्यांनी इतर महत्वाचे साक्षीदार तपासले नाही. त्यामुळे नि.क्र.१ वर झालेल्या आदेशानुसार अभियोग पक्षाच्या पुराव्याची बाजु बंद करण्यात आली.

**मुद्दे क्र.१ व २ करिता –**

६. अभियोग पक्षाने त्यांची बाजु सिध्द करण्याकरीता पंच सा.क्र.१ सुरेश यांना नि.क्र.२२ वर साक्ष नोंदवली. सरतपासादरम्यान त्यांना घटनास्थळ

पंचनामा दाखवला असता त्यावर त्यांची सही असल्याचे मान्य करून त्यातील मजकूर माहीत नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी अभियोग पक्षास सहाय्य केले नाही. साक्षीदार फितुर झाल्याने अभियोग पक्षातर्फे कलम १५४ भारतीय पुरावा कायद्या अन्वये उलटतपासाच्या अनुषंगाने प्रश्न विचारले, परंतु त्याची साक्ष अभियोग पक्षास समर्थ ठरली नाही.

**७.** अभियोग पक्षाने त्यांची बाजु सिध्द करण्याकरीता सा.क्र.२ शोभा यांनी नि.क्र.२५ वर साक्ष नोंदवली. आरोपी व फिर्यादीला ती ओळखत नसून घटनेबद्दल माहित नसल्याचे त्यांनी कथन केले. साक्षीदाराने त्यांच्या पुराव्यामध्ये बयाना प्रमाणे साक्ष दिली नाही. साक्षीदार फितुर झाल्याने अभियोग पक्षातर्फे फिर्यादीस कलम १५४ भारतीय पुरावा कायदया अन्वये उलटतपासाच्या अनुषंगाने प्रश्न विचारले परंतु तिची साक्ष अविचलीत करण्यास अभियोगपक्ष असमर्थ ठरला.

८. कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार अभियोग पक्षाला आरोपीचा अपराध सर्व शंकेपलिकडे सिध्द करणे क्रमप्राप्त होते. परंतु सदर प्रकरणामध्ये साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनाला सहकार्य केले नाही. त्यामुळे रिपोर्ट मधील मजकुर शाबीत झाले नाही. प्रकरणातील सा.क्र.२ शोभा ही फिर्यादी व आरोपील ओळखत नसून तिला घटने बाबत काहीही माहिती नसल्याचे कथन करुन अभियोग पक्षाला साथ न दिल्याने अभियोग पक्षाची बाजु बंद करण्यात आली. आरोपी विरुध्द कोणताही पुरावा अहवालावर आलेला नाही. वरील सर्व बाबी विचारात घेता असे दिसून येते की, अभियोग पक्ष हे सिध्द करु शकला नाही की, आरोपींनी फिर्यादीस लाकडी काठीने मारहान करुन इच्छापुर्वक दुखापत केली. म्हणून हे न्यायालय असे मत व्यक्त करते की, अभियोग पक्ष आरोपीविरुध्द वरील कलमान्वये अपराध सिध्द करण्यास अपयशी ठरल्याने

दोन्ही आरोपी निर्दोष सुटका होण्यास पात्र आहेत. त्यामुळे मुद्दे क्र.१ चे उत्तर नकारार्थी व मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करण्यात येते.

**–:: आ दे श ::–**

(१) आरोपी क्र.**१) पवन दिलीप पानसे व २) राहूल रमेशराव पाटनकर** ला भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ सह कलम ३४ खालील अपराधाच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

(२) आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

(३) खटल्यातील जप्त लाकडी काठी मुल्यहीन असल्याने अपील कालावधी नंतर नष्ट करण्यात यावी.

(४) आरोपींनी त्यांचे जमानती मुचलके प्रत्येकी ₹ १५,०००/– चा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) च्या पुर्तते करीता दयावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला).

**स्वाक्षरी/–**
**(आय. जे. ठाकरे)**
**दि.१५/०७/२०२६** **सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वरुड.**